अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ५ ऑगस्ट २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३०७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## कर्नाटकानंतर गुजरातचा महाराष्ट्रातील गावांवर दावा

✔ **पालघर** : दक्षिणेत बेळगाव प्रमाणेच उत्तरेत गुजरात आणि महाराष्ट्र सीमावादाचा मुद्दा पुढे येत आहे. तलासरी तालुक्यातील गुजरातच्या सीमेवर असलेल्या काही गावांमध्ये गुजरातच्या ग्रामपंचायतीने घुसखोरी केल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्रातील गावांवर, भूभागावर गुजरात दावा सांगत असल्याचा मुद्दा डहाणूचे आमदार विनोद निकोले यांनी लक्षवेधीद्वारे उपस्थित केला होता. त्यानंतर वेवजी गावात गुजरातच्या ग्रामपंचायतीने काम केले असल्याचे समोर आले आहे. गुजरातच्या सोलसुंबा ग्रामपंचायतीने बेकायदा पथदिवे लावून घुसखोरी केल्याच्या प्रकारावरून महाराष्ट्रातील वेवजी ग्रामस्थांनी विरोध सुरू केल्यामुळे हा सीमावाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे.




गुजरात आणि महाराष्ट्राच्या सीमा भागातील अनेक व्यवहार दोन्ही राज्यांच्या सीमेवरील गावांवर चालतात. उंबरगाव येथील सोलसुंभा ग्रामपंचायतीने महाराष्ट्रातील वेवजी ग्रामपंचायत हद्दीत दीड किलोमीटर आत घुसखोरी केल्याने सीमावाद अद्याप चिघळत आहे. दोन राज्यांतील सीमा सुस्पष्ट व्हावी, त्यामध्ये सुसूत्रता यावी, दोन राज्यांच्या सीमेवर नागरिकांना विनातक्रार प्रवास करता यावा, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, आदानप्रदान टिकवण्यासाठी दोन्ही राज्यांच्या सीमेवरील ग्रामपंचायती आणि प्रशासनाने एकत्र येऊन हा रेंगाळलेला प्रश्न तात्काळ मार्गी लावणे गरजेचं झालं आहे.

# सूप वाजले... मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना 'टोले'
# 'ज्योतिष' तयार झाले, सरकार 'भक्कम' बनले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्य विधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची शुक्रवारी सांगता झाली. शेवटचा दिवसही वादळी ठरला. विरोधकांनी केलेल्या आरोपांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समारोपाच्या भाषणात अत्यंत शांत डोक्याने विरोधकांना टोले लगावले तसेच टीका व टोमण्यांचा भडिमार केला. सध्याचे विरोधक कधी नव्हे इतके गोंधळलेले आहेत. पूर्वी सर्व कामांचा, बोलण्याचा दर्जा घसरून टोमण्यांचा जमाना आला होता. आमचे सरकार पडणार, मुख्यमंत्री बदलणार अशी भाषा करणारे दररोज नवनवीन ज्योतिष तयार झाले. उठसूठ भाकिते केली. पण उलट सरकार अधिक मजबूत झाले. आमचे सरकार 'ऑनलाईन' नसून दारात जाऊन काम करणारे आहे. असे सांगत शिंदे यांनी विरोधकांचा समाचार घेतला.**



### मोदींची प्रशंसा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शिंदेंनी प्रशंसाही केली. कुणी आपल्या पंतप्रधानांना बॉस म्हणतो, कुणी सेल्फी काढतो, कुणी वाकून नमस्कार करतो. काही म्हणतात, तुम्ही पॉवरफुल आहात. ही बाब आपल्याला अभिमानास्पद आहे. मोदींनी देशाची अर्थव्यवस्था दहाव्या क्रमांकावरुन पाचव्या क्रमांकावर आणली. आता तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न करत आहेत. ९ वर्षात एकही सुट्टी न घेतलेला पंतप्रधान आपण बघितला आहे. त्यांचं नेतृत्व या देशाला प्रगतीपथाकडे नेईल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



### सरकार मजबूत झाले

सरकार पडण्याची, मुख्यमंत्री बदलाची भाषा करणाऱ्यांनाही मुख्यमंत्र्यांनी लक्ष्य केले. शिंदे म्हणाले, वर्षभर सरकार पडणार, पडणार पडणार असे म्हणत होते. यात नाना पटोलेही आघाडीवर होते. आधी १७० आमदारांचे पाठबळ होते, मात्र विकासाचा वेग पाहून अजितदादाही बरोबर आले. त्यामुळे संख्याबळ २१५ वर जाऊन सरकार मजबूतच झाले आहे. शिंदे यांच्या या विधानावर सत्ताधारी आमदारांनी बाके वाजली.

मुख्यमंत्री शिंदे यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला. त्यावेळी विरोधक सरकारवर तुटून पडले. सरकार कसे निष्क्रिय ठरले, याचा पाढा विरोधकांनी विधान सभेत वाचला. त्याला उत्तर देताना शिंदे यांनी विरोधकांचा प्रत्येक मुद्दा खोडून काढला. त्यावेळी त्यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. विरोधी पक्षनेत्यांबाबत शिंदे म्हणाले, लोकशाही बळकट करण्यासाठी विरोधकांची गरज असते. त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच विरोधी पक्षनेत्याची निवड होणे आवश्यक होते. मात्र आजच्या इतके कधी नव्हे इतके विरोधक गोंधळलेले आहेत. त्यांनी आपला आत्मविश्वास गमावलेला आहे,अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. या अधिवेशनात उद्योगांबाबत श्वेतपत्रिका काढून खरे-खोटे करण्याचे धाडस दाखवल्याचे सांगून उदय सामंतांचे शिंदेंनी कौतुक केले. काही दिवसांपूर्वी राज्यातील प्रकल्प बाहेर गेल्याची टीका झाली, मात्र श्वेतपत्रिका जाहीर केली. राज्यात एक लाख १८ हजार कोटींनी गुंतवणूक झाली. यामुळे गुंतवणूक राज्य पुन्हा पहिल्या क्रमांकावर गेले आहे. दावोसमधील झालेल्या एमओयूची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. शासन आपल्या दारी उपक्रमातून सव्वा कोटी नागरिकांना फायदा झाला. महाविकास आघाडीमुळे काही प्रकल्प रखडवले होते. ते प्रकल्प युतीचे सरकार आल्यानंतर मार्गी लावले. आम्ही फिल्डवर जाऊन काम करतो, हे सरकार घरी बसून काम करणारे नाही, अशा शब्दात त्यांनी विरोधकांना झापले.

**घसरलेला दर्जा सुधारला :** शिक्षणाचा दर्जा घसरल्याचा उल्लेख काही लोकांनी केला. आघाडीच्या काळात दोन वर्षांमध्ये बऱ्याच गोष्टींचा दर्जा घसरला आहे. शिक्षण, विचार आणि आर्थिक गुंतवणुकीचा दर्जा घसरला आणि टोमण्यांचा जमाना आला. परंतु हा घसरलेला दर्जा आम्ही सुधारण्याचे काम करतोय. परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्राने पहिला क्रमांक पटकावला आहे. शैक्षणिक विकासकामांबाबत सरकारने खंबीरपणे पावले उचलली आहेत. गणवेशासोबत शूज देण्याचा निर्णय घेतला असून शिक्षकांची ३० हजार पदं पुढील दोन महिन्यात भरणार आहोत. साखर उद्योगाकरीता शासन पाऊल उचलले. उद्योगांसाठी वीज दर कमी केला असून १२०० कोटी सबसीडी दिल्याचे शिंदे म्हणाले.

**वडेट्टीवारांचे आरोप :** विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर अनेक आरोप केले. गृह आणि सार्वजनिक आरोग्य, जलसंपदा विभागातील अनेक पदे रिक्त आहेत. राज्यात एकूण दीड लाख पदे रिक्त आहेत. गृह मंत्र्याच्या नागपूर जिल्ह्यामध्ये फसवणूक ५१ कोटींची झाली. या ऑनलाईन गेमवर बंदी घालणार का? केंद्र सरकारने अनुसूचित जाती जमाती यांना घटनात्मक दर्जा दिला. मात्र राज्यात कधी घटनात्मक दर्जा मिळणार? आमच्या काळात ७२ वसतिगृह सुरू करायचा निर्णय झाला होता. मात्र तो अंमलात आला नाही. २००४ मध्ये विलासराव देशमुख यांनी शिष्यवृत्ती सुरू केली होती. मात्र ती आता बंद आहे. वेदांता फाक्सकॉन प्रोजेक्ट महाविकास आघाडीत योग्य रितीने सुरु होता. ठाकरे यांनी राजीनामा देताच हा प्रोजेक्ट गुजरातला कसा गेला. महाराष्ट्रातील रोजगार पळवून लावण्यामागे कोण आहे? असा संतप्त सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

**ठाकरेंना लगावला टोला... :** मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडीसह ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. आमच्या सरकारच्या शासन आपल्या दारी या उपक्रमाला राज्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे पण महाविकास आघाडीच्या काळात शासन आपल्या दारी नाही तर घरी होते, असे सांगून शिंदेंनी ठाकरेंच्या कारभाराचा पंचनामा केला.

## खंडाळीतून हरवलेल्या ६ वर्षाच्या मुलीचे प्रेत कालव्यात सापडले

### पाण्यात बुडून मरण पावल्याची शक्यता

✔ सुराज्य/वेळापूर

माळशिरस तालुक्यातील खंडाळीमधील दत्तनगर येथून दि. २ ऑगस्ट रोजी खंडाळी दत्तनगर येथून हरवलेल्या सहा वर्षाच्या मुलीचा मृतदेह श्रीपूर येथील निरा कालव्यात सापडल्याने या भागात खळबळ उडाली आहे.

खंडाळीतील भाऊसाहेब राऊत विद्यामंदिरात पहिलीत शिकणारी आदिती गणेश चौगुले ही शाळेच्या दुपारच्या सुट्टीमध्ये गायब झाली होती. शुक्रवारी तिसऱ्या दिवशी सायंकाळी ६.०० च्या सुमारास या मुलीचे प्रेत श्रीपूरकडे जाणाऱ्या निरा कालव्यामध्ये सापडले. आदिती ही मुलगी दिनांक २ ऑगस्ट रोजी शाळेची १.३० ते २.३० च्या दरम्यान जेवणाची सुट्टी झाल्यानंतर तिने मैत्रिणींबरोबर शाळेच्या कट्ट्यावर जेवण केले. त्यानंतर शाळेची घंटा वाजल्यानंतर आदितीने मी घराकडे जाते असे सांगून गेली.ती परत



आलीच नाही. आदितीच्या आई-वडिलांनी सगळीकडे चौकशी करून सुद्धा अदितीचा ठाव ठिकाणा लागत नसल्याने सदर मुलीस कोणीतरी अज्ञात आरोपीने कशाची तरी अमिष दाखवून तिला फूस लावून पळून नेल्याची फिर्याद दि. ३ ऑगस्ट २०२३ रोजी वेळापूर पोलीस स्टेशनला दिली.

या प्रकाराचे गांभीर्य ओळखून वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सई भुरे पाटील यांच्या सूचनेनुसार या घटनेची वेगाने तपासास सुरुवात केली. घटनास्थळी वेळापूर पोलीस तळ ठोकून वेगवेगळ्या अँगलने सलग दोन दिवस आदितीचा हिचा शोध घेत होते. मात्र शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास निरा कालव्यामध्ये एका मुलीचे प्रेत पाण्यात दिसले. ही खबर मिळताच बागाव यांनी पोलीस कर्मचारी आणि मुलीचे नातलग यांच्या समवेत जाऊन कालव्याजवळ पाहणी केली. सदरचे प्रेत हे आदितीचे असल्याचे निष्पन्न झाले. वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संजय राऊत, पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक संजय रेगुडे, जनार्दन करे, गणेश क्षीरसागर, श्रीपुर आउट पोस्टचे पोलीस चंदनशिवे आदींनी प्रेत पाण्यातून बाहेर काढून पोस्टमार्टमसाठी अकलूजला पाठवले. डॉक्टरांनी मुलीचा मृत्यू हा पाण्यात बुडून झाला असल्याचे सांगितले. आदिती ही दत्तनगर खंडाळी येथे वेगाने वाहणाऱ्या निरा कालव्यामध्ये हातपाय धुताना घसरून पाण्यात पडली असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## भारत-विडींज उद्या दुसरा टी-२० सामना

✔ **दिल्ली** : पहिल्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजने पाच धावांनी विजय मिळवला आहे. वेस्ट इंडिजने दिलेल्या १५० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाला ९ विकेटच्या मोबल्यात १४५ धावाच करता आल्या. मालिकेत वेस्ट इंडिजने १-० ने आघाडी घेतली. आता भारतीय संघ उद्या होणाऱ्या दुसऱ्या टी-२० सामन्यात विजयी पुनरागमन करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पोलिस नाईक कांबळे एसीबीच्या जाळ्यात

### १५ हजार स्वीकारण्यास संमती दिल्याप्रकरणी

✔ सुराज्य/सोलापूर

वाळू चोरीची कारवाई न करण्यासाठी व चोरीबद्दलचा अहवाल न पाठवण्यासाठी २० हजारांची लाच मागून १५ हजार रुपये स्वीकारण्यास संमती दिल्याप्रकरणी पोलीस नाईक एसीबीच्या जाळ्यात अडकला आहे. पोलीस नाईक दत्तात्रय रामचंद्र कांबळे असे गुन्हा दाखल केलेल्या पोलिसाचे नाव आहे.

यातील तक्रारदार यांचे कवठेगांव येथे घराचे बांधकाम




सुरू असून बांधकामासाठी लागणारी वाळू ही तक्रारदार यांनी त्यांच्या भावाच्या घरासमोर रस्त्याच्या कडेला टाकली होती. आरोपी कांबळे याने तक्रारदार यांच्या भावास वाळू चोरीची आहे, तुमच्या विरुद्ध गुन्हा दाखल करतो, असे म्हणून तक्रारदार यांच्या भावास पोलीस स्टेशनला घेऊन गेले. त्यानंतर हे प्रकरण मिटवण्यासाठी २० हजार रुपये लाचेची मागणी केली. या प्रकरणी ७ जून रोजी पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली. त्यात आरोपी कांबळे याने तक्रारदार व त्यांच्या भावाविरुद्ध वाळू चोरीची कारवाई न करण्यासाठी व तहसीलदार यांना वाळू चोरीबद्दल अहवाल न पाठवता, त्याबदल्यात सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण केल्याचा २८३ प्रमाणे भाग ६ ची कारवाई करून प्रकरण मिटवून टाकतो, असे सांगून १५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी कांबळे याच्यावर सलगरवस्ती पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, हवालदार पकाले, सोनवणे, घुगे, जाधव, नरोटे, घाडगे, गायकवाड यांनी केली.

## पीएसआय खून प्रकरण : पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली, सहा टीम आरोपींच्या शोधात

### आतापर्यंत सातजणांची कसून चौकशी; खुनाचा उलगडा करण्याचे पोलिसांसमोर आव्हान

✔ सुराज्य/सांगोला

अज्ञात कारणावरून निलंबित पोलीस उपनिरीक्षक सूरज विष्णू चंदनशिवे (वय ४२) यांचा अज्ञात व्यक्तीने खून केला. त्याचा तपास लावण्यासाठी सांगोला पोलीस ठाण्यातील तीन पथक व गुन्हे अन्वेषणच्या तीन पथकातून तपास केला जात आहे.

हा तपास प्राथमिक स्वरूपाचा असून आत्तापर्यंत सात जणांची कसून चौकशी केली आहे पण अद्यापपर्यंत या खुनाचा उलगडा होऊ शकलेला नाही. यामुळे या खुनाचा तपास करणे पोलिसांसमोर




आव्हान निर्माण झाले आहे. चंदनशिवे हे वासुद गावचे रहिवाशी आहेत. त्यांचा खून झाल्यानंतर गुरुवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्यावर सांगोला ग्रामीण रुग्णालयांमध्ये कॅमेरासमोर शवविच्छेदन करण्यात आले. सायंकाळी वासुद स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या खुनाचा तपास करण्यासाठी पोलिसांनी त्यांचे जुने मित्र असणारे व त्यांच्यासोबत असणाऱ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. या खुनाचा तपास लावण्यासाठी वारणा नगर (ता. पन्हाळा) येथील ९ कोटी रुपयांच्या चोरी प्रकरणातील माहिती स्थानिक पोलिसांकडून मागवण्यात आली आहे तसेच यामध्ये सामील असणाऱ्यांचीही चौकशी करण्यासाठी त्यांनाही संपर्क साधण्यात आला आहे तसेच सांगली येथेही कोण आरोपी असू शकतात तेथील पोलिसांकडून माहिती मागवण्यात आली आहे.

> सुरज चंदनशिवे यांच्या खुनाच्या तपासासाठी प्राथमिक माहिती घेण्याचे काम चालू आहे सर्वच बाजूने तपास यंत्रणा राबवली जात आहेअद्याप पर्यंत या खुनाचा धागेदोरे हाती आलेले नाहीत दोन दिवसात या खुनाचा तपास लागेल
> विक्रांत गायकवाड
> **- उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा, जि.सोलापूर**

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**लै टेन्शन मदी आहे वाटतं, चल बोलू.. बरं वाटल !!!**

**कल्याण**
**489-18-288**

**मेन बाजार**
**390-24-356**

# शेतकऱ्यांना आता एक हजार रुपये पीकविमा मिळणार

## विमा कंपनीची रक्कम कमी असल्यास उर्वरित रक्कम राज्य सरकार देणार

✔ सुराज्य/मुंबई

विधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी शेतकऱ्यांसाठी कृषिमंत्र्यांनी मोठी घोषणा केली. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आणि सकारात्मक पाऊल उचलले आहे. शेतकऱ्यांना आता कमीत कमी एक हजार रुपये पीक विमा मिळणार असून, विमा कंपनीची रक्कम कमी असल्यास उर्वरित रक्कम राज्य सरकार देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विधान परिषदेतील प्रश्नोत्तराच्या तासात बोलत असताना धनंजय मुंडे यांनी ही माहिती दिली आहे. खरीप हंगाम २०२२ मधील काही पिक विमाधारक शेतकऱ्यांना विमा मिळाला नसल्याबाबतचा प्रश्न विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला होता. यावर मुंडे यांनी सविस्तर उत्तर देत खरीप हंगाम २०२२ ची संपूर्ण आकडेवारी सभागृहासमोर मांडली.

२०२२ च्या खरीप हंगामात एकूण विमाधारक शेतकऱ्यांना ३ हजार १८० कोटी इतकी पीक विमा रक्कम मंजूर करण्यात आली असून त्यापैकी सुमारे ३१४८ कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली आहे तसेच उर्वरित शेतकऱ्यांची विम्याची रक्कम ही १००० रुपये पेक्षा कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना कमीत




कमी एक हजार रुपये पिक विमा मिळावा, अशी शासनाची भूमिका आहे. त्यावर उपाय म्हणून यापुढे शेतकऱ्यांना विम्या पोटी मिळणारी रक्कम १००० रुपयांपेक्षा कमी असल्यास त्यात उर्वरित रक्कम राज्य शासन देईल आणि शेतकऱ्यांना कमीत कमी एक हजार रुपये पीक विमा हा निश्चित मिळेल, अशी घोषणाही मुंडे यांनी शुक्रवारी विधानपरिषदेत केली.

शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास विमा कंपनीला या नुकसानीची माहिती ७२ तासांच्या आत देण्याचा नियम आहे, यात बदल करून किमान ९६ तास इतकी मुदत देण्यात यावी अशा प्रकारची मागणी केंद्र सरकारकडे करणार असल्याची माहिती मुंडे यांनी दिली. बऱ्याचदा अतिवृष्टीच्या सारख्या संकटाच्या काळात वीज पुरवठा खंडित असणे, इंटरनेटची सुविधा बंद असणे, मोबाईल नेटवर्क नसणे अशा प्रकारच्या अनेक समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते.

### राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिलासा

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून तुषार आणि ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेण्यासाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांना कमीत कमी २० गुंठे जमिनीची अट आहे. ही अट शिथिल करण्याबाबत माजी राज्य मंत्री आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर बोलताना धनंजय मुंडे यांनी सदर अट वीस गुंठे वरून दहा गुंठेपर्यंत शिथिल करण्यात यावी, याबाबत देखील केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल, अशी माहिती सभागृहास दिली.**

अशा परिस्थितीत या सुविधा पूर्ववत व्हायला काही कालावधी लागतो. त्यामुळे ७२ तासांच्या आत नुकसानीची माहिती देण्यास अनेक शेतकरी असमर्थ ठरतात, अशावेळी या कालावधीत आणखी काही तासांची वाढ देण्यात यावी, अशा प्रकारची मागणी बऱ्याच सदस्यांनी देखील केली होती. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत मुंडे यांनी हा कालावधी किमान ९६ तास केला जावा, याबाबत केंद्र सरकारकडे मागणी करून त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.